नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

| वर्ष - २ रे<br>Year - 2nd | अंक - २६८<br>Issue - 268 | वार शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी २०२५<br>Blow- Friday Date 14 February 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|


## ‘वक्फ’बाबत जेपीसी अहवाल संसदेत

### सहाशे पानी अहवाल सादर, काँग्रेससह इंडिया आघाडीच्या सदस्यांचा सभात्याग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : वादग्रस्त वक्फ दुरुस्ती विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीचा (जेपीसी) अहवाल गुरुवारी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधी सदस्यांच्या गदारोळात मांडण्यात आला. वक्फसंदर्भातील अंतिम अहवालात समाविष्ट करण्यासाठी विरोधी सदस्यांनी दिलेली असहमतीची जोडपत्रे (डिसेंट नोट) काढून टाकल्याचा आरोप विरोधकांनी केला. या आक्षेपाच्या मुद्द्यावरून राज्यसभेत काँग्रेससह इतर ‘इंडिया’ आघाडीच्या सदस्यांनी सभात्याग केला.

लोकसभेतील विरोधकांच्या आक्षेपानंतर, ‘विरोधकांच्या असहमती जोडपत्रांच्या समावेशाला माझ्या पक्षाचा आक्षेप नाही’, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी स्पष्ट केले. त्याआधी सभागृहातील विरोधी पक्षांचे खासदार, लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला व केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांच्या बैठकीमध्ये विरोधकांची जोडपत्रे जशीच्या तशी अहवालात समाविष्ट करण्यावर सहमती झाली. लोकसभेमध्ये जेपीसीचे अध्यक्ष जगदम्बिका पाल तर, राज्यसभेत समितीच्या सदस्य व भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी अहवाल पटलावर मांडला. अहवालाच्या विश्वासार्हतेवर शंका उपस्थित होत असलेले विरोधी जोडपत्रातील मुद्दे वगळण्याचा समितीच्या अध्यक्षांना अधिकार असतो, असे केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी संसदेच्या आवारात पत्रकारांना सांगितले.



राज्यसभेमध्ये विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी अहवाल पुन्हा जेपीसीकडे पाठवण्याची मागणी केली. ‘जेपीसीच्या अहवालात अनेक सदस्यांनी असहमती जोडपत्रे दिली होती. ही जोडपत्रे काढून टाकली आहेत. अशारीतीने विरोधकांच्या विचारांची मुस्कटदाबी करणे योग्य नाही. केंद्र सरकारचे हे कृत्य लोकशाहीविरोधी आहे. आम्ही असा बनावट अहवाल कधीही स्वीकारणार नाही. जर अहवालात असहमतीची जोडपत्रे समाविष्ट केली नाहीत तर अहवाल समितीकडे परत पाठवून जोडपत्रांसह तो पुन्हा सादर करावा’, असे खरगे म्हणाले. त्यावर, असहमतीची जोडपत्रे हटवलेली नाहीत. तुम्ही सभागृहाची दिशाभूल करू नका, तुमचा हा आरोप बिनबुडाचा आहे. जेपीसीने कोणत्याही नियमाचे उल्लंघन केलेले नाही, असे संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी स्पष्ट केले.

‘अहवालाला विरोध हे त्यांचे तुष्टीकरणाचे राजकारण आहे. काही लोक तर भारतीय राज्ययंत्रणेविरुद्ध लढण्याचा प्रयत्न करत आहेत’, अशी टीका राज्यसभेचे नेते जे. पी. नड्डा यांनी राहुल गांधींचे नाव न घेता केली.

वक्फ अहवालाच्या आधारे केंद्र सरकार विद्यामान दुरुस्ती विधेयकाच्या मसुद्यामध्ये बदल करू शकते. त्यानंतर संसदेमध्ये नवे विधेयक मांडले जाईल. राज्य वक्फ मंडळाचे अधिकार व समिती सदस्यांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेमध्ये बदल करण्यात येणार आहेत. त्यामध्ये वक्फ जमीन ठरवण्याचा अधिकार जिल्हाधिकारी वा त्यापेक्षा वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याला असेल. वक्फ मंडळाच्या समितीवर दोन मुस्लिमेतर सदस्यांची नियुक्ती केली जाईल, अशा दोन महत्त्वाच्या शिफारशींचा अहवालात समाविष्ट केला आहे. सुमारे सहाशे पानी अहवालामध्ये सत्ताधारी ह्यएनडीएह्नच्या सदस्यांच्या १४ दुरुस्त्यांचा समावेश केला असून विरोधकांच्या ४४ आक्षेपांच्या शिफारशी बहुमताने फेटाळण्यात आल्या आहेत.

## भारत-अमेरिका द्विपक्षीय सहकार्य वाढविण्यावर भर



वॉशिंग्टन/नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यासाठी गुरुवारी येथे आगमन झाले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची ते भेट घेऊन चर्चा करतील. दौऱ्याच्या पहिल्याच दिवशी पंतप्रधानांनी अमेरिकेचे राष्ट्रीय गुप्तचर खात्याच्या संचालक तुलसी गॅबार्ड आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांच्याशी झालेल्या चर्चेत द्विपक्षीय सहकार्यावर भर देण्यात आला.

अमेरिकी अध्यक्षांच्या ‘ब्लेअर हाउस’ या अतिथी निवासामध्ये मोदी राहणार आहेत. पंतप्रधान मोदींचे भारतीय समुदायाने मोठे स्वागत केले. अमेरिकेचे राष्ट्रीय गुप्तचर खात्याचे संचालक तुलसी गॅबार्ड यांची पंतप्रधानांनी भेट घेतली. भारत आणि अमेरिका यांच्यातील मैत्रीसंबंधांवर त्यांच्याशी चर्चा केली. गॅबार्ड यांचे नव्या नियुक्तीबद्दल पंतप्रधानांनी अभिनंदन केले.

भारत-अमेरिका मैत्रीसाठी गॅबार्ड यांनी कटिबद्धता व्यक्त केली, असे वक्तव्य पंतप्रधान मोदींनी केले. दहशतवादविरोध, सायबर सुरक्षा आणि इतर नवे धोके यांत अमेरिकी गुप्तचर खात्याबरोबर सहकार्य वाढविण्यावरही चर्चा झाल्याचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी ‘एक्स’वर दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) मायकल वॉल्ट्ज यांची भेट घेतली. वॉल्ट्ज यांच्याशी ही पंतप्रधानांची पहिलीच भेट होती. या बैठकीला परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवालदेखील उपस्थित होते.

## मणिपूरमध्ये अखेर राष्ट्रपती राजवट लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : गृहमंत्रालयाने मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू केल्याचे जाहीर केले आहे. गेल्या काही दिवसांपासून मणिपूरमध्ये मोठ्या प्रणाणात जातीय हिंसाचार झाला आहे. या पार्श्वभूमीवर रविवारी मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. दरम्यान मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिल्याच्या काही दिवसातच राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सिंग यांनी मणिपूरमध्ये तब्बल २१ महिने जातीय हिंसाचार सुरू राहिल्यानंतर राजीनामा दिली होता. मणिपूरमधील हिंसाचारात जवळपास २०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे तर हजारो लोक विस्थापित देखील झाले आहेत. मणिपूरमध्ये मे २०२३ पासून मेतेई आणि कुकी-झो समुदायांमध्ये जातीय संघर्ष सुरू आहे.

मणिपूरमध्ये यापूर्वी भारतीय जनता पक्षाच्या (भाजपा) नेतृत्वाखालील सरकार होते. नोव्हेंबर २०२४ मध्ये, कॉनराड संगमा यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल पीपल्स पार्टी (एनपीपी) ने एन. बिरेन सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर ९ फेब्रुवारी रोजी सिंग यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. भाजपाने बिरेन सिंग यांच्यानंतर मुख्यमंत्री पदाच्या दावेदारासाठी मतैक्य तयार करण्यासाठी प्रयत्न केले. मात्र भाजपा नेतृत्वाला यामध्ये यश आले नाही. मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी काँग्रेस आणि इतर राजकीय विरोधकांकडून सातत्याने केली जात होती.

## १७० कोटी रुपयांच्या बँक ठेवी गोठवल्या, कथित बनावट विदेशी मुद्रा व्यापार प्रकरणात ईडीची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : कथित बनावट विदेशी मुद्रा व्यापार आणि ठेव योजनेतील प्रवर्तकांकडे छापे टाकल्यानंतर १७० कोटी रुपयांच्या बँक ठेवी गोठवल्याची माहिती सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) गुरुवारी दिली. ‘क्यूएफएक्स ट्रेड लिमिटेड’ आणि तिचे संचालक राजेंद्र सूद, विनीत कुमार आणि संतोष कुमार याशिवाय मुख्य सूत्रधार नवाब अली ऊर्फ लविश चौधरी यांच्याविरोधात तपासाचा भाग म्हणून, ११ फेब्रुवारी रोजी दिल्ली, उत्तर प्रदेशातील नोएडा आणि शामली, हरियाणातील रोहतक येथील विविध भागांत हे छापे टाकण्यात आले.

हिमाचल प्रदेश पोलिसांनी ‘क्यूएफएक्स’ कंपनीविरुद्ध दाखल केलेल्या अनेक ‘एफआयआर’मधून आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाचा तपास सुरू झाला. यामध्ये बनावट ‘फॉरेक्स ट्रेडिंग’ योजनेद्वारे अनेक गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. ‘क्यूएफएक्स’ कंपनी आणि तिचे संचालक एक अनियमित ठेव योजना चालवत आहेत, ज्यामध्ये गुंतवणूकदारांना गुंतवणुकीवर उच्च परतावा देण्याचे वचन देण्यात आले होते, असा आरोप ईडीने केला आहे. ईडीच्या म्हणण्यानुसार ‘क्यूएफएक्स’ समूह कंपन्यांच्या दलालांनी ‘क्यूएफएक्स’च्या नावाने ‘मल्टी लेव्हल मार्केटिंग’ (एमएलएम) योजना आणून आणि विदेशी मुद्रा व्यापाराच्या नावावर उच्च दराने परतावा देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी संकेतस्थळ, ॲप्स आणि सोशल मीडिया जाहिराती तयार केल्या. पोलिसांकडे ‘एफआयआर’ दाखल केल्यानंतर ईडीला आढळले की, ‘क्यूएफएक्स’ योजनेचे नाव बदलून ‘वायएफएक्स’ (यॉर्कर एफएक्स) करण्यात आले आणि त्याच पद्धतीनुसार उच्च परताव्याच्या आमिषाने निष्पाप गुंतवणूकदारांची फसवणूक केली. यानंतर ‘क्यूएफएक्स’द्वारे अनेक योजना चालवण्यात येऊ लागल्या आणि त्यांचे नियंत्रण लविश चौधरी करत होता. अधिकाधिक ग्राहक गोळा करण्यासाठी भारतासह दुबईतही काही कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे ईडीला आढळले.

## पत्रकार मिलिंद जाधव यांना शिवीगाळ व जिवे ठार मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : बातम्या प्रसिध्द केल्यानंतर व ग्रामपंचायत मध्ये माहितीचा अधिकाराद्वारे माहिती मागविली असता मनात राग धरून पत्रकाराला अश्लील भाषेत शिविगाळ करून जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी बोरिवली ग्रामपंचायत सदस्या अश्विनी अशोक कशिवले, अशोक लहू कशिवले,अजय अशोक कशीवले यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यान्वये पडघा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.

भिवंडी तालुक्यातील पडघा, समतानगर येथे राहणारे पत्रकार मिलिंद जाधव यांनी शाळेच्या समस्या बद्दल बातम्या प्रसिद्ध केल्या होत्या. तसेच बोरिवली ग्रामपंचायत मध्ये माहितीचा अधिकार टाकला असताना माहिती मागवली होती. याचा मनात राग धरून बोरिवली ग्रामपंचायत सदस्या अश्विनी अशोक कशिवले, अशोक लहू कशिवले, मुलगा अजय अशोक कशिवले यांनी पत्रकार मिलिंद जाधव यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून अजय कशीवले याने जिवेठार मारण्याची धमकी दिली होती. पत्रकाराला न्याय मिळावा म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे व पदाधिकाऱ्यांनी पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करावा असे निवेदन पडघा पोलीस स्टेशन मधी दिले होते.तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाला पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यश आले आहे. अश्विनी कशीवले , अशोक कशिवले,अजय कशीवले यांच्या विरोधात भादवि कलम ३५१(२) ३५२ तसेच महाराष्ट्र पत्रकार संरक्षण कायदा कलम ३ व ४ अन्वये पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे करीत आहेत.

## हर्षवर्धन सपकाळ महाराष्ट्र काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत दमदार कामगिरी करणाऱ्या काँग्रेस पक्षाची नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत अत्यंत निराशाजनक कामगिरी झाली होती. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या जागी नवा प्रदेशाध्यक्ष निवडण्यात येणार असल्याच्या चर्चा होत्या. अखेर आज अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षपदी हर्षवर्धन सपकाळ यांनी नियुक्ती केली आहे. याचबरोबर मल्लिकार्जुन खरगे यांनी विजय वडेट्टीवार यांची महाराष्ट्र काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून नियुक्ती करण्यासही मान्यता दिली आहे. याबाबत अखिल भारतीय काँग्रेस समितीच्य अधिकृत एक्स अकउंटवर माहिती देण्यात आली आहे.



दरम्यान अखिल भारतीय काँग्रेस समितीने एक पत्रक जारी केले असून, त्यामध्ये म्हटले आहे की, काँग्रेस अध्यक्षांनी हर्षवर्धन सपकाळ यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षपदी तात्काळ प्रभावाने नियुक्ती केली आहे. मावळते अध्यक्ष नाना पटोले यांच्या योगदानाचे पक्ष कौतुक करतो. याचबरोबर काँग्रेस अध्यक्षांनी महाराष्ट्रातील काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून विजय नामदेवराव वडेट्टीवार यांची नियुक्ती तात्काळ प्रभावाने करण्यास मान्यता दिली आहे.

### अनेक घोषणांमुळे दोन लाख कोटींपेक्षा अधिकची वित्तीय तूट

### पुरेशा निधीचा अभाव




## राज्य सरकारकडून खर्चात ३० टक्के कपातीचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा निवडणुकीर्पूवी लोकप्रिय घोषणांमुळे चालू आर्थिक वर्षात मार्चअखेर महसुली आणि भांडवली खर्चात ३० टक्के कपात करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला . सरकारी वाहनांच्या इंधनावरील खर्चातही २० टक्के कपात करण्याची वेळ सरकारवर आली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, लाडका भाऊ, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा घोषणांमुळे दोन लाख कोटींपेक्षा अधिकची वित्तीय तूट, पुरेशा निधीचा अभाव यामुळे सरकारला आखडता हात घ्यावा लागत आहे.

खर्च वाढला तरी राज्याची आर्थिक परिस्थिती भक्कम असल्याचा निर्वाळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार हे वारंवार देत होते. पण खर्चासाठी पुरेसे पैसेच उपलब्ध नसल्याने भांडवली खर्चात ३० टक्के कपात सरकारला करावी लागली आहे. सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरू असताना आवश्यक खर्चासाठी निधीची उपलब्धता लक्षात घेता मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी ७० टक्के रक्कम खर्च करण्यात यावी, असा आदेश काढण्यात आला आहे.

वाहनांच्या इंधन खर्चात अनेक वर्षांनी कपात करण्यात आली आहे. बक्षीस वितरण, विदेश प्रवास, प्रकाशन, संगणक खर्च, जाहिरात, बांधकामे, कंत्राटी सेवा, सहायक अनुदान, मोटार वाहन यासाठीच्या निधी वितरणाचे प्रस्ताव प्रत्यक्षात किती निधी खर्च झाला याची खात्री करूनच १८ फेब्रुवारीच्या आत संबंधित विभागांना वित्त विभागाकडे पाठवावे लागणार आहेत. खर्च न होणारा निधी क्षेत्रीय अधिकारी, मंडळे आणि महामंडळांच्या बँक खात्यात ठेवता येणार नसल्याचे वित्त विभागाने स्पष्ट केले आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकप्रिय घोषणांचा सपाटा लावण्यात आला होता. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ४६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली. सुमारे एक लाख कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. यातून वित्तीय तूट दोन लाख कोटींवर गेली आहे. या पार्श्वभूमीवर खर्चात कपात करण्याशिवाय पर्याय नव्हता, असे सांगण्यात आले.

अर्थसंकल्पीय वर्षाच्या अखेरीस तरतूद केलेल्या निधी खर्चावर सर्व विभागांचा भर असतो. १२ फेब्रुवारीपर्यंत सरकारने ८ लाख २३ हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदींपैकी ६ लाख १८ हजार कोटी रुपये वितरित केले आहेत.

प्रत्यक्षात खर्च ३ लाख ८६ हजार कोटी रुपये म्हणजेच अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ४६.८९ टक्के खर्च झाला आहे. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या उरलेल्या कालावधीत सर्व विभागांकडूनच खर्चावर मर्यादा घालण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे वित्तीय तूट मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न वित्त विभागाकडून करण्यात येत आहे. यंदा सुमारे ५ लाख १० हजार कोटी रुपयांचा महसूल मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे खर्चात कपात केली तरच वित्तीय तूट कमी होण्याची शक्यता आहे.

या योजनांना वगळले : सर्व विभागांच्या खर्चाला कात्री लावण्यात आली असली तरी जिल्हा वार्षिक योजना, आमदार स्थानिक विकास निधी, केंद्र पुरस्कृत योजनांतील केंद्र व राज्य हिस्सा यांची निधी वितरणाची मर्यादा १०० टक्केच ठेवण्यात आली आहे. याच बरोबर शिष्यवृत्ती, विद्यावेतन, कर्ज, व्याज, आंतरलेखा हस्तांतरणे, निवृत्तिवेतनविषयक खर्च यांनाही १०० टक्के निधी वितरणाची परवानगी देण्यात आली आहे.

## संपादकीय....

### आखडता हात

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, लाडका भाऊ, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा घोषणांमुळे दोन लाख कोटींपेक्षा अधिकची वित्तीय तूट, पुरेशा निधीचा अभाव यामुळे सरकारला आखडता हात घ्यावा लागत आहे. खर्च वाढला तरी राज्याची आर्थिक परिस्थिती भक्कम असल्याचा निर्वाळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार हे वारंवार देत होते. पण खर्चासाठी पुरेसे पैसेच उपलब्ध नसल्याने भांडवली खर्चात ३० टक्के कपात सरकारला करावी लागली आहे. सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरू असताना आवश्यक खर्चासाठी निधीची उपलब्धता लक्षात घेता मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी ७० टक्के रक्कम खर्च करण्यात यावी, असा आदेश काढण्यात आला आहे. वाहनांच्या इंधन खर्चात अनेक वर्षांनी कपात करण्यात आली आहे. बक्षीस वितरण, विदेश प्रवास, प्रकाशन, संगणक खर्च, जाहिरात, बांधकामे, कंत्राटी सेवा, सहायक अनुदान, मोटार वाहन यासाठीच्या निधी वितरणाचे प्रस्ताव प्रत्यक्षात किती निधी खर्च झाला याची खात्री करूनच १८ फेब्रुवारीच्या आत संबंधित विभागांना वित्त विभागाकडे पाठवावे लागणार आहेत. खर्च न होणारा निधी क्षेत्रीय अधिकारी, मंडळे आणि महामंडळांच्या बँक खात्यात ठेवता येणार नसल्याचे वित्त विभागाने स्पष्ट केले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकप्रिय घोषणांचा सपाटा लावण्यात आला होता. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ४६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली. सुमारे एक लाख कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. यातून वित्तीय तूट दोन लाख कोटींवर गेली आहे. या पार्श्वभूमीवर खर्चात कपात करण्याशिवाय पर्याय नव्हता, असे सांगण्यात आले. याच बरोबर शिष्यवृत्ती, विद्यावेतन, कर्ज, व्याज, आंतरलेखा हस्तांतरणे, निवृत्तिवेतनविषयक खर्च यांनाही १०० टक्के निधी वितरणाची परवानगी देण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीर्पूवी लोकप्रिय घोषणांमुळे चालू आर्थिक वर्षात मार्चअखेर महसुली आणि भांडवली खर्चात ३० टक्के कपात करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला . सरकारी वाहनांच्या इंधनावरील खर्चातही २० टक्के कपात करण्याची वेळ सरकारवर आली.

# प्रेमीयुगुलांसाठी प्रेमाचा उत्सव - व्हॅलेन्टाईन्स डे !

भारतात मोठ्या प्रमाणावर हा दिवस प्रेमीयुगलांकडून साजरा केला जातो. तथापि, 'व्हॅलेन्टाईन्स डे हा आपल्या संस्कृती विरुद्ध आहे' असे म्हणून भारतातील बजरंग दल व इतर कट्टरतावादी हिंदू धार्मिक संघटना याला विरोध करतात, असे असतानाही 'व्हॅलेंटाईन डे' भारतामध्ये जास्त प्रमाणात लोकप्रिय होत आहे. दरवर्षी 'व्हॅलेन्टाईन्स डे' हा प्रेम दिवस म्हणून १४ फेब्रुवारी रोजी जगभर साजरा केला जातो. हा एकप्रकारे प्रेमीयुगुलांसाठी प्रेमाचा आणि रोमांसचा अनोखा उत्सवच आहे. हा एक ख्रिश्चन सण सुद्धा आहे तसेच या दिवशी लोक त्यांच्या प्रियकर-प्रेयसी, जोडीदार किंवा आपल्या आवडत्या व्यक्तीला शुभेच्छा संदेश, फुले, सुंदर भेटवस्तू किंवा चॉकलेट पाठवून प्रेम व्यक्त करतात. या दिवसाची सुरूवात एका रोमन उत्सवापासून झाली. रोममध्ये उन्हाळ्याच्या दिवसांत 'लुपरकॅलिया' नावाचा उत्सव साजरा केला जायचा. या उत्सवात मुले बॉक्समधून मुलींच्या नावे काढत असत. उत्सवा दरम्यान ही जोडपी प्रेयसी-प्रियकर बनून फिरत असत आणि कधी-कधी ते लग्नबंधनात देखील बांधली जात. नंतर तेथील चर्च ख्रिश्चन उत्सव म्हणून आणि संत व्हॅलेंटाईनच्या स्मरणार्थ हा दिवस एखाद्या सणाप्रमाणे साजरा करण्यास सुरूवात केली. यानंतर लोक आपलं प्रेम व्यक्त करण्यासाठी सेंट व्हॅलेंटाईन नावाचा वापर करू लागले.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

असं म्हणतात, प्रेम ही एक अशी भावना जी व्यक्त होताच चेहरा खुलतो, बहर येतो. तसं बघितलं तर प्रेमाची भावना व्यक्त करण्यासाठी कुठल्याही ठराविक वेळेची किंवा जागेची गरज नसते. ३६५ दिवस हे प्रेमाचेच असतात पण 'व्हॅलेंटाइन डे' की बात ही कुछ और ही है ! प्रेमाच्या या दिवसाने तरुणाईला वेड लावलं, असंही म्हटल्यास वावगं ठरणार नाही. अगदी ठरवून या दिवशी कुणी प्रेमात पडत नाही, मात्र तरीही वर्षभर याची तयारी सुरू असते. सेंट व्हॅलेंटाइनने याला विरोध करून काही सैनिकांचा विवाह लावून दिला. आणखी एक जोड संत व्हॅलेंटाईनने ख्रिश्चन सैनिकांसाठी विवाह केले ज्यांना लग्न करण्यास मनाई होती. केलेडियसला हे समजल्यानंतर त्याने व्हॅलेंटाइनला तुरुंगात डांबलं. तुरुंगात असतानाच व्हॅलेंटाइनचा जीव जेलरच्या मुलीवर आला. प्रेम केल्याची शिक्षा म्हणून १४ फेब्रुवारीला व्हॅलेंटाइनला फाशी देण्यात आली होती. फाशीच्या आदल्या दिवशी व्हॅलेंटाइनने प्रेयसीला स्वाक्षरी केलेले पत्र लिहिले आणि पत्राचा शेवट 'युअर व्हॅलेंटाइन' असा केला. तेव्हापासूनच १४ फेब्रुवारीला हा दिवस साजरा केला जातो. व्हॅलेंटाईन डे सेंट व्हॅलेंटाईन नावाच्या ख्रिश्चन हुतात्म्यांच्या नावाने साजरा केला जातो. एका दंतकथेनुसार ख्रिश्चन संत व्हॅलेन्टाईनचा हा बलिदान दिवस आहे. परंतु युरोप मध्ये अजूनही संदिग्धता आहे की, नक्की कोणत्या व्हॅलेन्टाईन नावाच्या व्यक्तिपासून सुरुवात झाली. नंतरच्या काळात जगातील अनेक ठिकाणी प्रणय आणि प्रेमाचा एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक, धार्मिक आणि व्यावसायिक उत्सव बनला. सेंट व्हॅलेंटाईन बद्दल एकमत नसले तरी त्याबद्दल अनेक कथा प्रचलित आहेत पण सर्वात लोकप्रिय कथा रोमन किंग क्लॉडियस आणि सेंट व्हॅलेंटाईन यांची आहे. क्लॉडियसने आपल्या सैनिकांना लग्न करण्यास मनाई केली होती, पण सेंट व्हॅलेंटाईनने अनेक सैनिकांना लग्नासाठी तयार केले आणि त्यांचे लग्न लावून दिले. राजाला राग अनावर झाल्याने त्याने १४ फेब्रुवारी २६९ रोजी संत व्हॅलेंटाईनला फाशीवर चढवलं.

पाश्चात्य ख्रिश्चन चर्च हे व्हॅलेन्टाईन डे १४ फेब्रुवारीला साजरा करतात आणि पूर्व सनातनी चर्च ६ जुलै/३० जुलै रोजी साजरा करतात. तिसऱ्या शतकात रोमन साम्राज्यात छळलेल्या ख्रिश्चनांची सेवा केल्याबद्दल रोमच्या सेंट व्हॅलेंटाईनला तुरुंगात टाकल्याच्या वृत्तासह, १४ फेब्रुवारीशी जोडलेल्या विविध व्हॅलेंटाईनशी संबंधित अनेक हौतात्म्य कथा आहेत. सुरुवातीच्या परंपरेनुसार, सेंट व्हॅलेंटाईनने त्याच्या जेलरच्या अंध मुलीला दृष्टी बहाल केली. दंतकथेतील नंतरच्या अनेक जोडांनी ते प्रेमाच्या थीमशी अधिक चांगले जोडले आहे. व्हॅलेंटाईनचा उत्सव पोप गेलेसियस-१ याने इ.स. ४९६ मध्ये स्थापन केला होता, जो रोमच्या संत व्हॅलेंटाईनच्या सन्मानार्थ १४ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो, जो इ.स. २६९ मध्ये त्या तारखेला मरण पावला. हा दिवस १४ व्या आणि १५ व्या शतकात रोमँटिक प्रेमाशी जोडला गेला जेव्हा दरबारी प्रेमाच्या कल्पना फुलल्या, वरवर पाहता वसंत ऋतूच्या सुरुवातीच्या लव्हबर्ड्सच्या सहवासामुळे. १८ व्या शतकातील इंग्लंडमध्ये हे अशा प्रसंगात वाढले, ज्यामध्ये जोडप्यांनी फुले सादर करून मिठाईची ऑफर देऊन आणि ग्रीटिंग कार्डे ('व्हॅलेंटाईन' म्हणून ओळखले जाते) पाठवून एकमेकांबद्दलचे प्रेम व्यक्त केले. आज वापरल्या जाणाऱ्या व्हॅलेंटाईन डे चिन्हांमध्ये हृदयाच्या आकाराची बाह्यरेखा, कबूतर आणि पंख असलेल्या कामदेवाची आकृती समाविष्ट आहे. १९ व्या शतकापासून हस्तलिखित व्हॅलेंटाईनने मोठ्या प्रमाणावर उत्पादित ग्रीटिंग कार्ड्सला मार्ग दिला आहे. इटलीमध्ये सेंट व्हॅलेंटाईन कीज प्रेमींना 'एक रोमँटिक प्रतीक आणि देणाऱ्याच्या हृदयाला अनलॉक करण्यासाठी आमंत्रण म्हणून' तसेच मुलांना अपस्मार (ज्याला सेंट व्हॅलेंटाईन मॅलाडी म्हणतात) पासून दूर ठेवण्यासाठी दिल्या जातात.




व्हॅलेंटाईन डे ची कोणत्याही देशात सार्वजनिक सुट्टी नाही, जरी तो अँग्लिकन कम्युनियन आणि लुथेरन चर्चमध्ये अधिकृत मेजवानीचा दिवस आहे. ईस्टर्न ऑर्थोडॉक्स चर्चचे अनेक भाग ६ जुलै रोजी रोमन प्रेस्बिटर सेंट व्हॅलेंटाईनच्या सन्मानार्थ आणि ३० जुलै रोजी इंटरअम्ना (आधुनिक टर्नी) चे बिशप हायरोमार्टीर व्हॅलेंटाईन यांच्या सन्मानार्थ सेंट व्हॅलेंटाईन डे साजरा करतात. व्हॅलेंटाईन डे प्रथा ग्रीटिंग कार्ड पाठवणे, मिठाई आणि फुले सादर करणे. सुरुवातीच्या आधुनिक इंग्लंडमध्ये विकसित झाले आणि १९ व्या शतकात इंग्रजी भाषिक जगामध्ये पसरले. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २१ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात, या प्रथा इतर देशांमध्ये पसरल्या, जसे की हॅलोवीन, किंवा ख्रिसमसच्या पैलूंपेक्षा, (जसे की सांताक्लॉज). हा दिवस अनेक पूर्व आशियाई देशांमध्ये साजरा केला जातो ज्यामध्ये सिंगापूर, चिनी आणि दक्षिण कोरियाचे लोक व्हॅलेंटाइनच्या भेटवस्तूंवर सर्वाधिक पैसे खर्च करतात.

आपण हा दिवस होममेड कार्ड, मिठाई, गुलाब, रोमँटिक डेट, मित्रांसमवेत वेळ घालवून साजरा करू शकतो आणि हा दिवस साजरा करण्याचे अजूनही बरेच मार्ग आहेत. आपण रोमँटिक डिनर किंवा लंचसाठी बाहेर जाऊ शकता किंवा कोणत्याही रोमँटिक ठिकाणी वेळ घालवू शकता. या दिवशी आपण आपल्या प्रियजनांना आवडत्या भेटवस्तू किंवा एखादा गोड पदार्थ देऊन नात्यातील स्नेह वाढवू शकता. या दिवशी एखाद्यावरील प्रेम व्यक्त करू शकता. व्हॅलेंटाईन डे मुलगा किंवा मुलगी कोणा एकासाठी नसून हा दिवस दोघांसाठी असतो. हा दिवस दोघेही साजरा करू शकतात. हा आनंदाचा किंवा प्रेमाचा उत्सव केवळ जोडप्यांसाठीच नव्हे तर मनातील प्रेमासाठी साजरा केला जातो आणि आपल्या मनातील ते प्रेम कोणासाठीही असू शकते. त्यामुळे हा दिवस तुम्ही आई-बाबा, भाऊ-बहिण, मित्रमैत्रीण कोणासाठीही साजरा करू शकता. आपल्या मनातील व्हॅलेंटाईन कोणीही असू शकतं. या दिवशी आपण आपल्या प्रियजनांना अनेक प्रकारचे प्रेमळ, रोमँटिक, सुंदर संदेश पाठवू शकता. असे संदेश जे प्रेमाची भावना व्यक्त करणारे किंवा या दिवसाचे महत्त्व सांगणारे असतात. सर्वांना व्हॅलेंटाईन डे च्या प्रेमळ शुभेच्छा !



## कुमार विद्या मंदिर शाळेचा स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्या मंदिर या शाळेचा स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साह संपन्न झाला. दतवड केंद्रामध्ये व शिरोळ तालुक्यामध्ये नावाजलेली शाळा असा गौरव या शाळेचा आहे.

क्रीडा स्पर्धा,सांस्कृतिक ,खेळ, तसेच प्रज्ञाशोध परीक्षा मध्ये शाळेचे विद्यार्थी नेहमी चमकत असतात. अनेक बाल विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेली कला सादरीकरण केले. अनेक क्रीडा परीक्षेमध्ये,नंबर आलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षिका, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, आपली मोलाची कामगिरी पार पाडली. यावेळी गावातील सर्व तरुण मंडळ स्वयंसेवक म्हणून काम पाहिले.

या कार्यक्रमासाठी ग्राम पंचायत सरपंच, उपसरपंच ,सर्व सदस्य, समस्त पालक ,माता-भगिनी, समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## उत्कर्ष विद्यालय मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा या तालुकास्तरीय उपक्रमात प्रथम क्रमांकाने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विरार : मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा टप्पा १ ( २०२४/२०२५) या अभियानांतर्गत राज्यात शासनामार्फत घेण्यात आलेल्या 'माझी शाळा,सुंदर शाळा' या उपक्रमात विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट उत्कर्ष विद्यालय प्राथमिक विभाग मराठी माध्यम या शाळेने शालेय गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांची उत्कृष्ट शैक्षणिक प्रगती यात शासनाचे सर्व निकष पूर्ण करत वसई तालुक्यातील प्रथम क्रमांक पटकावला. यासाठी संस्था, मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी आणि पालक वर्गांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. तीन लाख रुपयांचा धनादेश आणि प्रशस्तीपत्र देऊन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम.भक्ती वर्तक तसेच सहकारी शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.या अभियानाचा बक्षीस वितरण समारंभ दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी सेंट अँथनी हायस्कूल, मालोंडे, वसई (पश्चिम) या ठिकाणी संपन्न झाला. यावेळी वसई तालुक्यातील प्रथम तीन क्रमांक आलेल्या शाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बक्षीस वितरण समारंभासाठ,मान.श्री. अशोक पाटील (सभापती, पंचायत समिती,वसई) गटशिक्षणाधिकारी मा.माधुरीपाटोळे,जिल्हा परिषद सदस्य मा.कृष्णा माळी मा.सर्व वसई पंचायत समिती सदस्य शिक्षण विभाग, सर्व केंद्रप्रमुख , सर्व मुख्याध्यापक,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी आदी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

तालुकास्तरीय उपक्रमात द्वितीय क्रमांक पटकाविल्यामुळे विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष माननीय श्री. हितेंद्र ठाकूर, ट्रस्टच्या सेक्रेटरी अपर्णा ठाकूर, संस्थेचे खजिनदार शिखर हितेंद्र ठाकूर, व्यवस्थापन समितीचे सदस्य संजीव पाटील, संजय पिंगुळकर, एस.एन.पाध्ये, विद्यालयाचे समन्वयक नारायण कुट्टी यांनी सर्व शिक्षकवृंद यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## शिव-बसव-राणा- काशीबा महाराज जन्मोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी धुमाळ तर उपाध्यक्ष पदी यादव




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी : तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील छपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर, महाराणा प्रतापसिंग महाराज, व संत काशीबा महाराज अर्थात शिव-बसव-राणा- काशीबा महाराज जन्मोत्सव मंडळच्याअध्यक्ष पदी युवा कार्यकर्ते श्रीकार किशोर धुमाळ तर उपाध्यक्ष पदी नितीन यशवंत यादव यांची निवड करव्यात आली.

वागदरी येथे नुकतेच शिव- बसव - राणा - काशीबा महाराज जन्मोत्सव मंडळची बैठक संपन्न झाली या बाबैठकीत शिव जन्मोत्सवाच्या निमित्ताने शिव सप्ताहाचे आयोजन करून विविध उपक्रम राबविण्याचे ठरले असून जन्मोत्सव मंडळाची नुतन कार्यकारणीची निवड खेळीमेळीच्या वातावरणात करण्यात आली ती पुढील प्रमाणे अध्यक्ष श्रीकार धुमाळ, उपाध्यक्ष नितीन यादव, सचिव भगतसिंग ठाकूर, कार्याध्यक्ष शमसिंग चव्हाण, मिरवणूक प्रमुख नागेश बिराजदार, रमेश पवार रामसिंग चव्हाण,बालजी बिराजदार आदींची निवड करव्यातआली. यावेळी मंडळाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते ग्रामस्थ उपस्थित होते.

## कर्मयोगी कारखान्याच्या ऊसतोड मजुरांच्या कोपी शाळेमध्ये स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखान्याच्या मजूर वसाहतीमध्ये ऊसतोड मजुरांच्या कोपीवरच्या शाळेत स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धनजी पाटील साहेब आणि शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा श्रीमती पद्माताई भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यामध्ये प्रथमच ऊसतोड मजुरांसाठी मोफत प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू केले तसेच ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या शिक्षणामध्ये खंड पडू नये म्हणून कोपी वरची शाळा अभ्यास वर्ग सुरू केला त्याला आज पाच वर्ष पूर्ण झाली.





कोपीवरच्या शाळेमध्ये आज स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आयोजित केला होता, विद्यार्थ्यांनी विविध गीते बसवली होती. असावा सुंदर चॉकलेटचा बंगला, चाक धूम धूम, लल्लाटी भंडार, माझ्या डोळ्यातील काजळ, लेझी डान्स , ही पोर कशी मटकत चाल, गलती से मिस्टेक, चिट्ठी आई है, सोलो डान्स, गीते,त्याप्रसंगी मा. संचालक मच्छिंद्र अण्णा अभंग, बिजवडी ग्रामपंचायतीचे सदस्य देविदास यादव, सतीश चव्हाण, कर्मयोगी चे कार्यकारी संचालक देवराव लोकरे , प्रमुख शेती अधिकारी किशोर हिंगमिरे, कर्मयोगी चे ओएस शरद काळे, सिव्हिल इंजिनियर मोरे साहेब, देवळे साहेब, नवनाथ व्यवहारे, अनिल व्यवहारे ,शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव डॉक्टर गिरीष देसाई सर, खजिनदार तुषार रंजनकर सर, ट्रस्ट चे विश्वस्त अरविंद गारटकर सर, ट्रस्टचे मार्गदर्शक हमीदभाई आतार,ट्रस्टचे एडमिनर दीपक जगताप सर, उपक्रमाचे प्रमुख सागर कांबळे सर, जावेद हबीब चे प्रमुख अमोल राऊत सर, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉक्टर सारंगी कुंभार मॅडम, नर्स गौरी राठोड , सानिका फुलारी वॉर्डबोय आनंद नलावडे केंद्राचे प्रमुख महादेव चव्हाण सर तसेच कोपी वरच्या शाळेचे प्रमुख भारत बोराटे सर, शिक्षिका भक्ती चव्हाण, सानिका चव्हाण, पत्रकार बंधू शिवाजी आप्पा पवार, शिवाजी शिंदे, सोनकांबळे सर, सर्व विद्यार्थी ,पालक, टोळी मालक बांदल बापू, टोळी मालक गांडाळ बापू, कर्मयोगी चे सर्व अधिकारी पदाधिकारी कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सख्ख्या बहिणींनी रोवला एमपीएससीत यशाचा झेंडा ! गॅरेज चालकाच्या मुलींची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यशाला गवसणी !

## भाऊ श्रीनिवास याने खंबीर साथ दिल्याने मिळाली संजीवनी आणि सरोजिनी भोजने यांच्या यशाला गवसणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : घरचे अठराविश्व दारिद्र्य, आर्थिक परिस्थितीमुळे पाचवी पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या वडीलाचा गॅरेजचा तोडका- मोडका व्यवसाय, सहा माणसांचं कुटुंब चालविण्यासाठी सुरू असलेली वडिलांची धडपड, जिथे घर चालवण्याची चिंता तिथे मुला-मुलींच्या शिक्षणाचा तर विचारच न केलेला बरा. परंतु वडिलांच्या जिद्दीमुळे मुलींनी केलेला दृढनिश्चय कामाला आला आणि कामगार वस्ती परिसर असलेल्या गवळी वस्तीमधील गलिच्छ वस्ती सु-धारणा मधील आठ पत्र्याच्या घरातील गॅरेज चालकाच्या दोन्ही मुलींनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यशाचा झेंडा रोवला. संजीवनी आणि सरोजिनी अशी त्या दोन सख्ख्या बहिणी आणि पक्क्या मैत्रिणींची नावे असून ज्योतीराम भोजने हे पाचवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या गॅरेज चालक वडीलाचे आणि गृहिणी असलेल्या आईचे रेश्मा नाव आहे.



तर भाऊ श्रीनिवास याने खंबीर साथ दिल्याने यशाला गवसणी घातल्याचे संजीवनी आणि सरोजिनी भोजने यांनी सांगितले.

ज्योतीराम भोजने हे गवळी वस्ती मधील कामगार वस्ती भागात राहतात. त्यांचे शिक्षण पाचवीपर्यंत ओरोनोको प्राथमिक शाळेत झाले आहे. आर्थिक अडचणीमुळे त्यांना पुढे शिक्षण घेता आले नाही. परंतु त्यांनी मेकॅनिकल क्षेत्रामध्ये जम बसवला. ज्योतीराम यांना संजीवनी आणि सरोजिनी या दोन मुली आणि श्रीनिवास हा एक मुलगा आहे .ज्योतीराम ज्या घरात राह-तात ते घर आठ पत्र्याचे असून अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांनी आपले आयुष्य काढले आहे. ज्योतीराम यांना आपल्या वडिलांच्या आजारपणातच आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागले. काही वर्षांपूर्वी वडिलांचे निधन झाले. त्यानंतर ते पूर्णपणे आर्थिक दृष्ट्या खचून गेले होते. अशा परिस्थितीत मुलांच्या शिक्षणाचा तर विचार न केलेलाच बरा असाच प्रश्न त्यांच्यासमोर पडला होता. परंतु दोन्ही मुलींनी बीकॉम पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले .मोठी संजीवनी आणि छोटी सरोजिनी हिने बी कॉम नंतर २०१८ पासून एमपीएससी अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देण्याला सुरुवात केली. सात वर्षाच्या कालावधीत तीन वर्षे कोरोनाने अत्यंत हलाखीची परिस्थिति आणली. या काळात परीक्षाच होऊ न शकल्यामुळे त्या दोघी खचून गेल्या. परंतु आपण खचलो आहोत हे त्यांनी आई-वडिलांना दाखवून दिले नाही. संजीवनी आणि सरोजिनी ह्या दोघी सख्ख्या बहिणी असल्या तरी त्या पक्क्या मैत्रिणी झाल्या होत्या. आणि त्या दोघींनी सुद्धा एमपीएससी मध्ये यश मिळवायचेच हा एकमेव उद्देश डोळ्यासमोर ठेवून परिस्थितीला सामोरे जात अखेर यशाचा झेंडा रोवलाच. मंगळवारी रात्री साडेआठ वाजता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आणि कामगार वस्तीतल्या भोजने यांच्या घरात एकच आनंदोत्सव साजरा झाला. संजीवनी आणि सरोजिनी या दोघींनी सुद्धा सात वर्षात एकूण सहा एमपीएससीच्या मेन्स परीक्षा दिल्या. परंतु या सर्व वेळी त्यांना पॉईंटमुळे मागे पडावे लागत होते. मात्र जिद्द सोडली नाही. अखेर स्वामी समर्थांच्या भक्त असलेल्या संजीवनी आणि सरोजिनी यांना बुधवारच्या पौर्णिमेच्या आदल्या दिवशी रात्रीच गोड बातमी मिळाली. आई-वडिलांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली. कामगार वस्तीत अठरा विश्व दारिद्र्य आणि गॅरेजच्या आलेल्या पैशातून दोन्ही मुलींना शिकविण्या आनंद आई वडिलांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. सखा भाऊ पाठीशी असल्यानंतर बहिणी यशात मागे कशी पडूच शकत नाहीत, याची अनुभूती या निमित्ताने दिसून आली आहे.

### खचलो होतो थांबायचं सुद्धा ठरवलं होतं पण...

**घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक होती. दोन वेळच्या जेवणाची सुद्धा भ्रांत होती. गॅरेज मधून आलेल्या थोड्या पैशामधूनच घर चालवायचं आणि त्यातूनच शिक्षणासाठी लागणारी पुस्तक खरेदी करून द्यायची. कोरोना काळात पूर्ण खचून गेलो होतो आणि आता मुलींचे शिक्षण थांबवावे असा निर्णय मनोमन घेतला होता. परंतु मुलींच्या जिद्दीपुढे मला सुद्धा काही करता आले नाही. आणि अनेकांनी मदतीचा हात दिला. आणि आज सोनेरी दिवस उजाडला ,अशी प्रतिक्रिया संजीवनी आणि सरोजिनी यांचे वडील ज्योतीराम भोजने यांनी दिली.**

### सामाजिक कार्यात रस....

**आई-वडिलांचे प्रयत्न आणि सख्या भावाची जिद्द असल्यामुळेच आज आम्ही दोघींनी एमपीएससी मध्ये यशाचा झेंडा रोवला आहे. घरची अत्यंत हलाखीची परिस्थिती असताना सुद्धा केवळ आणि केवळ सामाजिक कार्य करण्याच्या अनुषंगाने आणि आई वडिल व भावा-ची इच्छा पूर्ण करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करून व अभ्यास करून परिस्थितीवर मात करून यश संपादन केले आहे. याचा मनोमन आनंद वाटतो. तीन वेळा पीएसआय ची परीक्षा दिली. एक वेळा सेल्स टॅक्स तर एकदा टॅक्स असिस्टंट पदासाठी परीक्षा दिली. मात्र पॉईंट मध्येच माघार पडले. परंतु अपयश पदरी येऊन सुद्धा खचलो नाही. आणि अखेर मंगळवारी आनंदाचा दिवस उजाडला .एमपीएससी उत्तीर्ण झाले असून मंत्रालय महसूल विभागात क्लार्क म्हणून आपणास पोस्ट मिळणार आहे. मोठ्या पदापर्यंत पोहोचलो तरी गरिबी विसरणार नसल्याचे संजीवनी ज्योतीराम भोजने हिने सांगितले.**

### डोक्यात फक्त आणि फक्त यशच .....

**सख्ख्या बहिणी असलो तरी आम्ही पक्क्या मैत्रिणी होतो. घरची परिस्थिती जाणून होतो. दररोजच घरचे अठरा विश्वदारिद्र्य डोळ्यासमोर दिसत होते. आठ पत्रे असलेल्या घरात आई ,वडील, तीन भावंड आणि आजी असे एकूण सहा जण कसेबसे दिवस काढायचो. यातून अभ्यासाला बसताना पाय सुद्धा पसरता येत नव्हते, अशी परिस्थिती होती .परंतु आई-वडील आणि भावाची आम्हा दोघींना शिकवण्याची जिद्द होती. त्याच जिद्दीला आम्ही सुद्धा साथ दिली आणि कोणत्याही परिस्थितीत एमपीएससी मध्ये यश मिळवायचंच अशी मनाची खूनगाठ बांधली. आणि यशाला गवसनी घातली. आपण महसूल सहाय्यक आणि कर सहाय्यक अशा दोन्ही पदासाठी पात्र असलो तरी कर सहाय्यक म्हणून काम करण्याची आपली इच्छा आहे. त्यामध्येच आपण आपले करिअर घडवत सामाजिक कार्यात वाहून घेणार असल्याचे सरोजिनी ज्योतिराम भोजने हिने सांगितले.**

### यांची झाली मदत ....

**एमपीएससीचा अभ्यास करत असताना अनेक अडचणींचा सामना करावा लागल्याचे सरोजिनी आणि संजीवनी सांगतात. ज्या - ज्या वेळी पुण्याला परीक्षेला जावे लागत होते, त्यावेळी आवसे वस्ती आमराई परिसरात असलेले आणि शेती करत असलेले मावस भाऊ प्रशांत शिव-ाजी बचुटे यांनी आर्थिक मदतीबरोबरच मानसिक आधारसुद्धा दिला. त्यामुळेच परीक्षा भयमुक्त वातावरणात देता आली. तर कोरोना काळात घरात जागा कमी पडू लागल्यामुळे वडिलांचे मित्र ब्रह्मदेव खटके यांनी गडदर्शन सोसायटीमधील त्यांच्या घराच्या खोल्या वर्षभरासाठी एकही रुपयाचे भाडे न घेता अभ्यासासाठी मोफत दिल्या. आई रेश्मा आणि आजी तारामती यांनी या कालावधीत सकाळ आणि सायंकाळ आशा दोन सत्रात चहा, नाष्टा आणि जेवण खोलीपर्यंत आणून दिले. त्यांचे उपकार आपण कधीच विसरणार नसल्याचे संजीवनी आणि सरोजिनी भोजने यांनी सांगितले.**

## थोडक्यात...




### सिद्धेश्वर पेठ येथून दुचाकी पळविली

सोलापूर : सिद्धेश्वर पेठ येयेथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम एच १३ बी एक्स १०४९ ही चोरून येण्याची घटना २९ जानेवारी रोजी घडली. या प्रकरणी गोविंद सदानंद दासरी (वय ४५, रा. नीलम नगर, एमआयडीसी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास चांदीचा टोप अर्पण





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस चंद्रभागा नारायण भांडे या भाविकांने दीड किलो वजनाचा चांदीचा टोप अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

त्याबद्दल देणगीदार भाविकांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी श्री विठ्ठलाची प्रतिमा, उपरणे, दैनंदिनी व दिनदर्शिका देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब उपस्थित होते. सदरचा चांदीचा टोप १ किलो ५०० ग्रॅम वजनाचा असून त्याची अंदाजे किंमत १ लाख ३३ हजार होत आहे. देणगीदार भाविक हे राज-ेर सावरकुंटे तालुका अकोला जिल्हा अहिल्यानगर येथील रहिवासी आहेत.

## निफाड येथे उद्या पासून श्रीखंडेराव महाराज यात्रोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड परिसराच्या आराध्य दैवत श्री खंडेराव महाराज यात्रा उत्सव दिनांक १२.२.२०२४ पासून प्रारंभ होणार असून सालाबाद प्रमाणे याही वर्षी विविध धार्मिक कार्यक्रमांबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक ७ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात रथांचा लिलाव करण्यात आला असून या वर्षी च्या रथांच्या लिलावाचे मानकरी.भाऊसाहेब किसन कापसे. यांनी ( एक लाख. आकरा हजार एकशे आकरारुपये) घेतला असून याचवेळी बारा गाड्यांची पूजन व विविध मान्यवरांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

दिनांक १२ फेब्रुवारी फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसहा वाजता



खंडेराव महाराज मंदिरात होम हवन होणार असून आठ वाजता शनी मंदिरापासून मांडव डहाळे यांची वाजत गाजत मिरवणूक निघणार आहे तर नऊ वाजता खंडेराव महाराज पादुकांपासून निफाड कोर्टाच्या मागून कावडीची भव्य मिरवणुकीचा कार्यक्रम होणार आहे दुपारी दोन वाजता कचेश्वर जानकीराम दुसाने यांच्या निव-ासस्थानापासून खंडेराव महाराज दैवतांचे पूजनास प्रारंभ होणार आहे तर दुपारी तीन वाजता श्री मारुती मंदिर व शनेश्वर चौकात होम हवन होणार आहे दुपारी साडेचार वाजता बाळासाहेब भानुदास लोखंडे यांचे जाणूनच घरी भागवत बाबांचे स्नान अंघोळीचा कार्यक्रम होणार आहे सायंकाळी साडेसहा वाजता रथ व बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होणार आहे याचे मानकरी नंदू भाऊ रमेश शेलार हे आहेत यावर्षीच्या यात्रा कमिटी अध्यक्ष पदी सुभाष कर्डिले, उपाध्यक्षपदी संजय दादा कुंदे, कार्याध्यक्ष नंदलालजी चोरडिया सचिव देवदत्त कापसे ,सह सचिव नामदेव लक्ष्मण जाधव,खजिनदार महेश जंगम,. प्रसिद्धीप्रमुख ह भ प राजेंद्र जी थोरात ,सह.खजिनदार विपुल संद्रे तर सांस्कृतिक कार्यक्रम अध्यक्षपदी साहेबराव बर्डे, उपाध्यक्ष सचिन गीते ,यांची निवड करण्यात आली आहे या वेळी राजाराम छ. शेल-ार, राजाभाऊ राठी, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे शिवाजीराजे ढेपले ,भागवत बाबा शेलार, रघुनाथ कुंदे ,रमेश जाधव, मधुकर शेलार, दौलतराव कापसे ,रतन गाजरे, योगेश कुंदे, संजय धारराव,विक्रम रंधवे, मुकुंद होळकर,संदिप शिंदे,आदी नागरिकांचे यात्रा कमिटीला मार्गदर्शन लाभणार आहे, याप्रसंगी निफाड नगरपंचायत च्या नगराध्यक्षा डॉ. कविता नितीन धारराव, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, मुख्याधिकारी अमोल चौधरी, तसेच नगरसेवक ,नगरसेविका, कर्मचारी वृंद व यात्रा कमिटी मार्गदर्शक, ग्रामस्थ उपस्थित होते

## हिंदू जनजागृती समितीच्या वतीने पोलीस प्रशासन व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

# नाशिक शहर उडता पंजाब होण्यापूर्वी, वाढत्या नशाखोरीवर तातडीने कठोर कारवाई करा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक शहरातील गंगापूर रोड, कॉलेज रोड, इंदिरानगर, पंचवटी आणि इतर भागांत नशेखोरी, अमली पदार्थांची विक्री, क्लब व हुक्का पार्लरमधील अनैतिक कृत्ये मोठ्या प्रमाणात वाढली असून यामुळे युवक-युवतींमध्ये व्यसनाधीनता वाढत आहे, सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तन आणि कायद्याचे उल्लंघन सर्रास होत आहे.

नुकत्याच समोर आलेल्या घटनांमध्ये नशेच्या प्रभावाखाली पोलिसांशी वाद घालणाऱ्या युवक-युवतींचे व्हिडिओ व्हायरल झाले असून, ही स्थिती अत्यंत गंभीर बनली आहे.

या समस्येवर तातडीने कठोर उपाययोजना करण्यासाठी हिंदू जनजागृती समितीच्या रणरागिणी शाखेच्या वतीने पोलीस प्रशासन आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

शहरातील काही क्लब, पब, हॉटेल आणि हुक्का पार्लर्समध्ये एमडी ड्रग्स, गांजा, कोकेन आणि इतर घातक मादक पदार्थांचे सेवन आणि विक्री होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यामुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत असून, समाजात गैरप्रवृत्ती वाढत आहेत. जर प्रशासनाने वेळीच कठोर कारवाई केली नाही, तर येत्या काळात नाशिक शहर उडता पंजाब होण्यास वेळ लागणार नाही

हिंदू जनजागृती समितीच्या प्रमुख मागण्या

रात्री १० नंतर पब, क्लब आणि हुक्का पार्लर बंद ठेवावेत. मादक पदार्थ विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी आणि त्यांना तातडीने अटक करावी. ड्रग्स तस्कर व पुरवठादारांना पकडण्यासाठी विशेष पोलिस पथक स्थ-ापन करावे. शाळा-महाविद्यालयांत नशाबंदी आणि व्यसनमुक्तीबाबत जनजागृती अभियान राबवावे. पालकांसाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करून युवकांच्या संगतीवर लक्ष ठेवण्यास प्रवृत्त करावे. लव्ह जिहाद आणि फसवणुकीच्या घटनांसाठी स्वतंत्र तपास पथक तयार करावे

**या विषयी कठोर पावले उचलण्यास पोलीस प्रशासनाने सुरवात केली असून, यापुढेही अशा घटनांचा अभ्यास करून तातडीने कठोर उपाययोजनात्मक कारवाई करण्यात येईल,असे आश्वासन पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव यांनी दिले.**




या मागणीचे निवेदन नाशिक येथील अप्पर जिल्हा दंडाधिकारी राजेंद्र वाघ व पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव यांना देण्यात आले. यावेळी भारतीय स्त्री शक्तीच्या .अनिता मुठे, .जयश्री चव्हाणके, देवस्थान समितीचे नंदकिशोर भावसार, अधिवक्ता ऍड .ललिता कुलकर्णी,ऍड. प्रियांका जाधव,ऍड.प्रेरणा वाघ,ऍड.संदीप जाधव विश्व हिंदू सेनेचे अधिवक्ता ऍड.महेंद्र शिंदे,अनंत खाडिलकर,मंदिर महासंघाचे नाशिक जिल्हा संयोजक किसन गांगुर्डे, सह संयोजक दिनेश मुठे,चेतन सूर्यवंशी,सनातन संस्थेच्या वैशाली अहिरराव,मीनाक्षी कोल्हे, हिंदू जनजागृती समितीचे अमोल शिंदे, सुमंत वैद्य,कु.रागेश्री देशपांडे हे उपस्थित होते.

## श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी सोन्याचा हार - ठुशी व चांदीची नाणी अर्पण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस पुष्पा नाथा शिंदे या भाविकाने सोन्याचा हार व ठुशी तसेच मोरया कन्स्ट्रक्शन आणि डेव्हलपर्स, पुणे यांनी चांदीची नाणी अर्पण केल्याची माहिती मंदिरे समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. पुष्पा नाथा शिंदे ह्या छत्रपती संभाजी नगर येथील रहिवाशी असून, त्यांनी ६.९ ग्रॅम वजनाचा सोन्याचा तीन पदरी हार व ठुशी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी अर्पण केली असून, त्याची अंदाजे किंमत ५० हजार होत आहे. त्याबद्दल त्यांचा मंदिरे समितीच्या वतीने मंदिर समितीचे विभाग प्रमुख विनोद पाटील यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचा प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी देण-गीदार यांचे कुटुंब उपस्थित होते. याशिवाय, मोरया कन्स्ट्रक्शन आणि डेव्हलपर्स, पुणे यांनी ११०० ग्रॅम वजनाचे गणपतीची प्रतिमा असलेली चांदीची ११ नाणी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी अर्पण केली असून, त्याची अंदाजे किंमत १ लक्ष होत आहे. त्याबद्दल मोरया कन्स्ट्रक्शन आणि डेव्हलपर्स, पुणे यांचेकडील रमेश येवले यांचा मंदिरे समितीच्या वतीने मंदिर समितीचे विभाग प्रमुख राजेंद्र घागरे यांनी मंदिर समितीची दैनंदिनी, दिनदर्शिका व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब उपस्थित होते.



विद्यार्थी समवेत पोषण आहाराचा आस्वाद घेताना तहसीलदार विशाल नाईकवाडे, गटविकास अधिकारी तुकाराम जाधव व विद्यार्थी.

# प्रशासनाचा अनोखा स्पर्श: तहसीलदारांनी अनुभवला पोषण आहाराचा स्वाद!

## जिल्हा परिषद शाळेत जाऊन विद्यार्थ्यांच्या जीवनाचा एक भाग झाले.त्यांच्या या अनोख्या भेटीने चर्चेचा विषय

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकसंपर्क वाढवावा आणि तळागाळातील लोकांच्या समस्या समजून घ्याव्यात,असे आवाहन अनेकदा केले जाते. पण निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी स्वतः पुढाकार घेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसोबत एक वेगळा संवाद साधला.केवळ कार्यालयीन मर्यादेत राहण्यापेक्षा ते थेट जिल्हा परिषद शाळेत जाऊन विद्यार्थ्यांच्या जीवनाचा एक भाग झाले.त्यांच्या या अनोख्या भेटीने चर्चेचा विषय निर्माण झाला.

**हसत-खेळत तहसीलदारांची शाळेला भेट...**

विशाल नाईकवाडे हे गुरुवार दि १३ फेब्रुवारी रोजी निफाडच्या शेवटच्या गावातील अचानक शाळेच्या आवारात पोहोचले तेव्हा विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत आश्चर्य दिसले.सरकारी अधिकाऱ्यांना सहसा फाईलींमध्ये आणि मिटिंगमध्ये पाहण्याचीच सवय असते.पण एखादा वरिष्ठ अधिकारी थेट आपल्या शाळेत आला,तोही गप्पा मारत,हसत-खेळत,यामुळे मुलांचे कुतूहल वाढले.

शाळेची पाहणी करताना त्यांनी विद्यार्थ्यांशी त्यांची शैक्षणिक स्वप्ने, अडचणी आणि आवड याबद्दल संवाद साधला.कोणाला डॉक्टर व्हायचं आहे,कोणाला पोलीस,तर कोणाला शिक्षक,मुलांच्या या उत्स्फूर्त संवादाने तहसीलदारही भारावून गेले. शिक्षकांनी शाळेच्या गरजा सांगितल्या आणि विद्यार्थ्यांची परिस्थिती उलगडून दाखवली.

**मुलांसोबत थाळीतील स्वाद आणि आत्मीयतेचा स्पर्श....**

खरी गोष्ट घडली तेव्हा तहसीलदारांनी विद्यार्थ्यांसोबत मध्यान्ह भोजन करण्याचा निर्णय घेतला.सरकारी पोषण आहार कसा असतो?त्याची गुणवत्ता काय आहे? आणि मुलांना तो कितपत आवडतो?हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी त्यांनी स्वतः जेवण घेतले.

जेव्हा तहसीलदार मुलांसोबत ताट घेऊन बसले,तेव्हा काही मुलांच्या डोळ्यांत चमक दिसली,काहींनी लाजत-लाजत खाणं सुरू केलं,तर काहींनी मजेत गप्पा मारत पोषण आहारावरच संवाद साधला. खिचडीभात चांगला शिजला आहे का?, असे प्रश्न विचारत नाईकवाडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यावर एका चिमुकल्याने आज पोषण आहार स्पेशल आहे,कारण साहेब आमच्यासोबत आहेत! असे म्हणून सर्वांना हसवले.

**शिक्षण आणि आरोग्य यांचा सुसंवाद**

या भेटीदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांना रोज शाळेत येण्याची आणि अभ्यासावर भर देण्याची प्रेरणा दिली. शिक्षणासोबतच शारीरिक पोषण हेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी पटवून दिले. ग्रामीण भागातील मुलांनी केवळ पुस्तकी शिक्षण न घेता, स्वतःच्या आरोग्यावरही लक्ष द्यावे, असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला.

> **तहसीलदारांनी शाळेला दिलेली भेट केवळ तपासणी नव्हती, तर ती एका कुटुंबप्रमुखासारखी होती. त्यांच्या या आत्मीयतेमुळे विद्यार्थी अधिक आत्मविश्वासाने शिकतील.**
>
> **– आशा उगले**
> **मुख्याध्यापिका, जि प्र शाळा डोंगरवाडी**

**मुलांच्या स्मरणात राहणारा दिवस**

ही केवळ एका अधिकाऱ्याची शाळा भेट नव्हती, तर ती त्या विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय आठवण होती.यानंतर काही मुलांनी असेही सांगितले की, आम्ही तहसीलदार साहेबांसारखे मोठे व्हायचे आहे! त्यांच्या या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा संचारली असून, शिक्षणाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अधिक प्रगल्भ झाला आहे.

तहसीलदारांनी आपल्या सहजसंवादी आणि आत्मीय भूमिकेने प्रशासन आणि विद्यार्थ्यांमधील अंतर मिटवत, एका नवीन युगाची नांदी केली. ते केवळ अधिकारी नव्हते, तर त्या दिवशी ते त्या शाळेच्या एक बापासारखे मार्गदर्शक झाले होते!

**प्रशासन आणि समाज यांच्यातील दुवा ठरलेले तहसीलदार...**

या भेटीमुळे प्रशासन हा केवळ आदेश देणारा घटक नसून, तो लोकांच्या जिव्हाळ्याचा भाग असतो,याची प्रचिती आली.

या प्रसंगी तहसिलदार विशाल नाईकवाडे, तुकाराम जाधव (गट विकास अधिकारी), प्रशांत बोरसे (विस्ताराधिकारी),विनायक नाथे, मुख्याध्यापिका आशा उगले संतोषी नांदूरकर युवा प्रशिक्षनार्थी सोनाली दराडे आदी उपस्थित होते.

# निफाड नगरपंचायतच्या वतीने अनाधिकृत बॅनर्स हटवण्याची मोहीम

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : उच्च न्यायालय झखङ १५५ अंतर्गत शासनाच्या निर्देशानुसार निफाड नगरपंचायत निफाड मार्फत शहरातील अनाधिकृत जाहिराती, होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर ,पोस्टर व आकाश चिन्हे इत्यादी बाबत दिनांक २६/१/२०२५ ते २६/०२/२०२५ या कालावधीमध्ये विशेष मोहीम अंतर्गत कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार आज शहरातील विविध ठिकाणातील बॅनर काढण्यात आले व संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. , नगरपंचायतचे मुख्याधिकारी




अमोल चौधरी यांनी शहरातील नागरिकांना परवानगी घेऊन ठ कोड सह जाहिराती, होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर, पोस्टर व आकाश चिन्हे इत्यादी लावणे बाबत आव्हान केले असे न झाल्यास संबंधितांवर कडक कारवाईचा इशारा मुख्याधिकारी यांनी दिलेला आहे. आज विशेष मोहिमेअंतर्गत केलेल्या कारवाई करिता नोडल अधिकारी गुलाबराव नवले, कर प्रशासकीय अधिकारी शरद बोडके, लेखापरीक्षक जयसिंग ठाकरे, कर लिपिक अनिल कुंदे, शरद काकुळते, रतन खालकर, नंदलाल भोसले, सुनिल गांगुर्डे, हर्षल धारराव, व इतर नगरपंचायत कर्मचारी यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

# बार्टीतर्फे वनंद येथे रमाई जयंती साजरी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने त्यागमुर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती त्यांचे जन्मस्थळ वनंद ता दापोली जिल्हा रत्नागिरी येथे विविध उपक्रमांद्वारे साजरी करण्यात आली.



बार्टीचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्टीच्या वतीने दिनांक ७ फेब्रुवारी २०२५ रोजी माता रमाई स्मारक वनंद येथे माता रमाई, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करण्यात आले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर व ईतर महापुरुषांच्या जिवनावरिल मौल्यवान पुस्तके अल्प दरात अनुयायांना उपलब्ध करून देण्यात आली होती.

बार्टी पुस्तक स्टॉलला भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा भीमराव आंबेडकर यांनी भेट दिली.

विभागप्रमुख श्रीमती वृषाली शिंदे व प्रकल्प व्यवस्थापक नसरीन तांबोळी यांच्या हस्ते त्यांना भारतीय राज्यघटनेची प्रत भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त अनुयायांना संविधान उदेशिकेचे मोफत वितरण करण्यात आले. यावेळी अनुयायांना बार्टीच्या वतीने फूड पकेट चे वाटप करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता श्रीमती इंदिरा आस्वार निबंधक व प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती नसरिन तांबोळी, श्री जमदाडे यांच्यासह समता दूत यांनी नियोजन केले.



















